# सलणारा सल - भाग १

मी नेहमीच्या माझ्या हॉटेलमध्ये बसलो होतो. रोजच्यासारखं "एक डबल ऑम्लेट-ब्रेड, कर्डराईस आणि नंतर हॉट चॉकलेट" अशी ऑर्डर दिली.

थोड्या वेळातच तिनं माझ्या टेबलवर माझी प्लेट आणून ठेवली. माझं लक्ष नव्हतं. कुठेतरी हरवल्यागत डोकं भणाणलं होतं. माझी एक फाईल हरवली होती ... त्या विचारात होतो.

आज सकाळी उठल्यावर घरी टीपॉयवर माझी फाईल मला दिसली नव्हती. घरी माझ्याशिवाय दुसरं कुणीही नव्हतं. माझ्यासाठी ती फाईल महत्वाची होती.

मी एक पुस्तक लिहित होतो. त्या पुस्तकाच्या प्रूफरिडिंगचे सर्व कागद त्या फाईलमध्ये होते. कालच ते प्रूफं तपासण्याचं काम पूर्ण झालं होतं. आणि आज ती फाईल कुठेतरी गहाळ झाली होती.

मी आठवायचा प्रयत्न करत होतो ...

काल ऑफिसमधून मी रोजच्या माझ्या हॉटेलमध्ये गेलो. जे थोडंफार प्रूफ तपासायचं काम बाकी होतं ते केलं. आणि तिथून थेट घरी गेलो!

घर म्हणजे माझं स्टुडिओ अपार्टमेंट. स्टुडिओ म्हटलं तरी जागा तशी स्पेशियस आहे. चांगली साडेपाचशे स्क्वेअर फुटाची. हवी कशाला फार मोठी जागा? मी एकटाच तर आहे. पण घरी त्या नीरव शांततेत हे प्रूफ रीडिंगचं काम करण्यापेक्षा हॉटेलमधल्या आजूबाजूच्या कोलाहलात माझं काम नीट होतं.

कधी कधी निर्जीव शांततेपेक्षा असा कोलाहल माणसाला भावत असावा.

मी विचार करत होतो. पुन्हा पुन्हा आठवून पहात होतो.

काल रात्री घरी गेल्यानंतर लॅपटॉपची बॅग नेहमीच्या जागी ठेवली. शॉवर घेतला. फ्रेश झालो. मग व्हिस्कीचा एक पेग घेतला. आदत से मजबूर! आणि बेडरूममधे झोपायला गेलो ...

फाईल घरी नाहीये, म्हणजे मी ती कुठेतरी विसरलोय. पण कुठे? मी लगेचच ह्या माझ्या नेहमीच्या हॉटेलमध्ये फोन करून विचारलं होतं सकाळीच. पण त्यांना काही अशी कोणती फाईल तिथे मिळाली नव्हती.

कुठे हरवली असेल फाईल? कुठे विसरलो असेन मी? बसमध्ये? तिथून पुढं रिक्षानं घरी गेलो होतो, त्या रिक्षामधे? आता शोधायचं कसं? गेला महिनाभर माझ्या व्यस्त कामातून वेळ काढून काल हे प्रूफरिडिंगचं काम पूर्ण केलं. आणि आता फाईल हरवली! बरं, कुणाला मिळाली तरी ती मला परत मिळणार कशी? तिच्यावर माझं फक्त नाव आणि सही होती. मोबाईल नंबर, पत्ता काहीच नव्हतं.

खरंतर तसं पाहता कुणाला त्या फाईलचा काही उपयोग नव्हता म्हणा. पण आता पुस्तक प्रकाशनाची तारीख नक्की केली होती. फाईल नाहीच मिळाली तर पुन्हा प्रूफरिडींग करावं लागणार! लॅपटॉपवरून नवी कॉपी काढून हे करता येणार होतं. पण आता हे सगळं पुन्हा नव्यानं करायचं म्हणजे ... जे मी विसरू पाहतोय, ते अजून पुढचे काही दिवस माझ्या डोक्याच्या खोपटीत पुन्हा पुन्हा आठवत रहाणार ...

----------

मनांत, डोक्यात खूप सारं साठलं होतं. आणि त्याने मी बेचैन राहू लागलो होतो. आमच्या एन.जी.ओ.मधल्या माझ्या जवळच्या मित्राजवळ हे सारं बोललो एकदा. त्यावेळी तो म्हणाला होता, "कागदावर लिहून काढ सारं. प्रत्येकीची कथा आणि व्यथा वेगळी! त्यांच्या व्यथा ऐकून डोकं बधिरलंय तुझं. हे एवढं मनांत ठेवायचं नसतं. कागदावर मांडून रिता हो. मग बरं वाटेल बघ."

आधी मला तो सारा मूर्खपणा वाटला.

पण मग मनांवर घेतलं. लिहायला सुरुवात केली. आणि खरंच, थोडं हलकं वाटू लागलं. रिलॅक्स वाटू लागलं.

संस्थेत दाखल झालेल्या या सगळ्या मुली. रंजलेल्या, गांजलेल्या, फसलेल्या, फसवल्या गेलेल्या, दु:खी अबला … पुरुषी अत्याचाराला बळी पडलेल्या …

----------

कालिंदी त्यातलीच एक … कालिंदीच्या लहानपणीच तिची आई वारली होती. मग मावशीने तिला स्वतःच्या घरी नेलं. स्वतःच्या मुलीसारखं सांभाळलं. कालिंदी सावळी, पण लोभस. नाकीडोळी नीटस- वयात यायला लागली, तशी आणखीनच लोभस दिसू लागली. रहायचीही नीटनेटकी. मावशीच्या मुलाचा तिच्यावर डोळा होता. तरुण वय होतं. एके दिवशी कोणी घरी नसताना त्याने संधी साधली. तिच्यावर बलात्कार केला. आणि मग हे वारंवार घडू लागलं. त्याला चटकच लागली त्या गोष्टीची. तिनं मावशीला सांगायचा प्रयत्न केला. पण स्वतःच्या मुलाबद्दल असलं काही ऐकूनच घेतलं नाही मावशीनं. शेवटी असह्य झालं तेव्हा एके दिवशी ही पळून आली तिथून. थेट इथे. मुंबईत. मी ज्या एन.जी.ओ.एजन्सीसाठी काम करतोय, त्याचा पत्ता मिळाला तिला. आली तेव्हा खूप घाबरली होती. मग आम्ही ट्रीट केलं तिला. डॉक्टर, सायकिॲट्रिस, आमची पूर्ण टीम. काही महिन्यांनी ती मेंटली पूर्णपणे नॉर्मल झाली असं वाटलं. त्यानंतर नर्सिंगचा कोर्स करायला लावला तिला. आता एका मॅटर्निटीहोममध्ये काम करतेय. चाळीत भाड्यानं जागा घेऊन राहतेय. छान चाललंय तिचं.

दुसरी परमिंदर. यू.पी.मधली. घरच्यांनी तिच्या मनाविरुद्ध तिचं लग्न ठरवलं होतं. हिचं तिच्याच कॉलेजमधल्या एका मुलावर प्रेम होतं. शिक्षण झालं की लग्न करणार होते दोघं. घरच्यांच्या भीतीने तिच्या त्या मित्राबरोबर पळून आली इकडे. इथे व्ही.टी.स्टेशनवर गाडीतून उतरल्यावर तिचा प्रियकर गर्दीत तिला सोडून कुठे पळून गेला, पत्ताच लागला नाही तिला. स्वतः त्याच्याबरोबर पळून आली होती. परत घरी जायला

घाबरली. आणि पोलिसात तक्रार करायलाही घाबरली. एका सद्गृहस्थामार्फत इथे संस्थेत पोचली. भरपूर समजावलं. सतत कौन्सिलिंग केलं. तेव्हा घरी वापस जायला तयार झाली. पण गावात बेअब्रू झाली होती. आई-वडिलांनी तिला घरी घ्यायचं नाकारलं. मग इथेच राहिली. संस्थेमार्फत जॉब मिळवून दिला तिला. आता इथं एका प्रायव्हेट कंपनीत नोकरी करतेय. पेईंगगेस्ट म्हणून एका आजींच्या घरी राहतेय. त्यांना सोबत झाली आणि हिलाही राहायला घर मिळालं.

अशाच रिमा, ममता, शर्मिला, कितीजणी ....

(क्रमशः)

**लीना माटे**

मो. 9819534428

304, अथर्व, माधव गडकरी चौक,

विलेपार्ले पूर्व, मुंबई 400 057